# * साने गुरुजी
# * लोकमान्य टिळक


## लेखक
## ॲड. शरद काशिनाथ राऊत


### कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट पुणेच्या सौजन्याने


ही पुस्तिका कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट पुणेच्या राष्ट्रभक्ती पर्यावरण आणि

आरोग्य साक्षरता अभियानअंतर्गत प्रकाशित केली.

पुस्तकाचे नाव : साने गुरुजी / लोकमान्य टिळक
लेखक : शरद काशिनाथ राऊत

प्रकाशक : बहुजन साहित्यधारा, पुणे
११ ए, राहुल कॉम्प्लेक्स,
चौथा मजला, पौड रोड, पुणे.
दुरध्वनी : ९८८१३७३५८५
हक्क प्रकाशकाचे स्वाधीन.
प्रकाशन दिनांक : २५ डिसेंबर २०२२ पहिली आवृत्ती
मुद्रक : श्री वेंकटेश पब्लिकेशन, पुणे
हिंगणे खुर्द, सिंहगड रोड. मो. क्र. ८२३७८ ९३३४७
पुस्तकाचे हक्क : ॲड. नंदिनी शहासने

ही पुस्तिका कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट पुणेच्या राष्ट्रभक्ती पर्यावरण आणि आरोग्य साक्षरता अभियानअंतर्गत प्रकाशित केली.

मूल्य : रूपये ४०/-
संपर्क : श्री. हेमंत प्रभाकर आळवे, ठाणे
मो. : ९३२२२६९७२१
श्री. अशोक जनार्दन फडणीस, मेणोली-वाई
९८५०५ ०९४१६
श्री. भानुदास सोपान पायगुडे, धनकवडी-पुणे
९८५०३५१०३५

Or Pay to VPA

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट पुणे या संस्थेस दिलेल्या देणग्या आयकर माफीस प्राप्त आहेत.
No.: THN/C.I.T.II/Tech/80G/104/2010-11/1479 Dt: 21/09/2010

# साने गुरूजी



## जन्म व बालपण

कोकणातील दापोली या तालुक्यापासून जवळच पालगड या गांवी साने कुटूंब राहत असे. पूर्वापार खोताचे घराणे साधारणतः वैभव संपन्न व श्रीमंत समजले जाते.

खोत म्हणजे गावचा ठरीव शेतसारा वसुल करून, सरकारकडे पाठविणारा दलाल. सरकारी शेतसाऱ्याच्या जवळ–जवळ चौथा हिस्सा खोताला फायदा असतो. ठरल्यावेळी खोताला शेतसाऱ्याचे हप्ते वसूल करता आले नाहीत तर पदरचे पैसे सरकारी तिजोरीत भरावे लागतात.

साने घराण्यातील एक कर्ते पुरुष सदाशिवराव. पण सदाशिवरावांच्या वेळेपासून घराण्याची आर्थिक परिस्थिती बदलत गेली. सदाशिवराव हे साने गुरुजींचे वडील, आईचे नांव 'यशोदा' होते. आईचेही माहेर त्याच गावात होते. साने गुरुजींचा जन्म २४ डिसेंबर १८९९ रोजी कोकणातील पालगड या गावी झाला. साने गुरुजींचे संपूर्ण नांव श्री. पांडुरंग सदाशिव साने. मात्र ते साने गुरुजी म्हणून ओळखले जात होते. गुरुजी शाळेत 'हुशार विद्यार्थी' म्हणून चमकू लागले. साने गुरुजींचे मन अतिशय भावना प्रधान व संस्कारक्षम होते. म्हणूनच आईने पेरलेल्या सद्भावनांची वाढ त्यांच्या ठिकाणी लवकर झाली.

## ''मुकी फुले''

गुरुजींना लहाणपणी फुले फार आवडत असत. गुरुजींच्या वडिलांनाही पुजेला भरपूर फुले पाहिजे असत. जास्वंद, कर्णचाफा, गुलाब, रास्तुरा वगैरे नाना फुलझाडे शेतावर होती. वडिल गणपतीचे मोठे भक्त. दररोज २१ दुर्वांची जुडी ते गणपतीला वाहावयाचे. वाटेल तितके लांब जातील, परंतु हिरव्यागार, झुबकेदार लांब दुर्वा ते घेऊन येतील. गुरुजींना आई लाडाने श्याम म्हणे. श्याम फुलांसाठी पहाटे उठत असे. गावात बकुळ वृक्ष होता. बकुळीची फुले नाजूक पण सुंदर व सुवासिक असतात. सकाळी

फुलांच्या परड्या भरून ठेवायच्या व दहा वाजता शाळा सुटून आल्यावर त्यांचे हार करावयाचे. वडील ते हार देवळांतील देवांना नेऊन घालीत.

सायंकाळी गुलबाक्षीची फुले गोळा करण्यासाठी शाळेतून धावत पळत घरी यायचे. गुलबाक्षीचे फुल फारच सुंदर असते. फुलांचा देठ लांब, बारीक व कोवळा असतो. देठाच्या टोकाला बारीक मणी असतो. पिवळी, पितांबरी, लाल-पांढरी, नाना रंगाची फुले काळ्या मण्यासह सुंदर दिसतात. त्यांच्या माळाही सुई-दोऱ्याशिवाय करता येतात.

रोज शाळा सुटल्यावर जो पाटीदप्तर घरी ठेवून आधी पळत जाई, त्याला अधिक फुले मिळत. परंतु रविवारी कोण केव्हा जाईल याचा नेम नसे. एका रविवारी श्यामला बाकीच्या मुलांनी एकही फूल मिळू दिले नाही. दुसऱ्या रविवारी श्यामने निश्चय केला की, आज आपण सारी फुले आणावयाची. गुलबाक्षीची फुले चार वाजल्यापासून फुलू लागतात. सायंकाळी नीट फुलतात.. श्यामने फुले फुलू लागण्याआधीच जाण्याचे ठरविले.

तीनचा सुमार, बाहेर ऊन होते. एक फडके बरोबर घेऊन श्याम शेजारच्या गोविंदशास्त्री, धोडोपंत मास्तर यांच्या परसांत फुले खुडायला आला. गुलबाक्षीच्या न फुललेल्या फुलांना 'धुबे' म्हणतात. सारे धुबे त्याने तोडून घरी आणले व ताम्हनात पाणी घालून त्यात कळ्या ठेवल्या. संध्याकाळी आईने श्यामला फुले तोडून आणण्याची आठवण केली. धुपारतीला (संध्याकाळची आरती) तरी फुले घेऊन ये!

'मी तर केव्हाच फुले आणून ठेवली आहेत. तू माळ करतेस का?' श्याम म्हणाला. आण तर, मी येथेच तुळशीजवळ बसते, म्हणजे घरात डेखे पडायला नकोत. आई म्हणाली. श्यामने ताम्हण आणले. ताम्हणातील फुले नीट फुलली नव्हती. मन खट्टु झाले. कळ्याच तोडून आणल्या होत्यास वाटते, श्याम अरे झाडावर नीट फुलू तरी द्यावे की, नाही त्यांना ? एवढा काय अधाशा सारखा गेलास ? उतावळा होऊन ? आई म्हणाली. इतक्यात बन्या, बापू, बाबी सारी मुले आली.

''श्यामने तुमच्या सारी फुले तोडून आणली. आम्हाला एकही फूल ठेवले नाही त्याने!''

''मागच्या रविवारी मला उशीर झाला तेव्हा, एक तरी फूल ठेवले होते का माझ्यासाठी ?'' श्यामने विचारले.

''पण मी माझ्या परडीतले देत नव्हते का ? तूच फणकाऱ्याने निघून गेलास'' बाबी म्हणाली.

आई शांतपणे म्हणाली, ''बन्या, बापू ही घ्या फुले. पुन्हा नाही हो श्याम असे करणार! नाही ना रे श्याम?'' असे म्हणून त्यांना फुले दिली.

''श्याम येत जा हो रोज संध्याकाळी फुले वेचायला! नाहीतर राग धरायचास तू. का आत्ताच येतोस? आपण छाप्योपाणी, नाहीतर लक्षुबाई ताक दे खेळ खेळू'' बन्या म्हणाला. ''आता उशीर झाला आहे. उद्या खेळा हो !'' असे आई म्हणाली. मुले गेली. श्यामचे तोंड गोरेमोरे झाले होते. त्यानंतर आई म्हणाली, ''श्याम दुसऱ्यांकडची फुले त्यांना विचारून आणावी. सर्वात वाईट गोष्ट म्हणजे अशी फुले तोडून आणणे. . तू अधीर झालास पण पदरात काही पडले नाही. घरच्या साध्या अन्नाने जशी पुष्टी येते तशी खानावळीतील दुधा तुपानेही येत नाही. कळ्यांना झाडावर फुलू दे. आपल्या घरातील देवांना सारी फुले हवीत असे वाटू नये. ते देवाला आवडणार नाही. देवाला एक फूल पण नीट फुललेले वाहा.''

श्यामने वडिलांपासून फुलांचे वेड घेतले, परंतु आईपासून फुलांवर प्रेम करावयास शिकला.

## निर्मळ मन

श्याम लहानपणापासून दोन वेळा स्नान करीत असे. सकाळी व संध्याकाळी. खेळून आल्यावर रात्री झोपण्याच्या आधी आंघोळ झाली असली तर शरीर स्वच्छ. निर्मळ व हलके वाटते.

एक दिवस श्याम नेहमीप्रमाणे घरी आला. सदरा काढून शेंडीला तेलाचे बोट लावून धोंडीवर आंघोळीस गेला. धोंड मोठी होती. आंघोळीचे पाणी तोंडलीच्या वेलास जात असे. आंघोळीला घंगाळ असे. आईने खसाखसा अंग चोळून दिले. श्यामने पाणी भराभरा घेतले. त्यावेळी अंग पुसायला टॉवेल नसत. पुरुष आपलेच ओले धोतर पिळून त्याला अंग पुशीत. एखादे जुनेर मुलांचे अंग पुसण्यासाठी असे. श्यामच्या आईने आपल्याच ओच्याला त्याचे अंग पुसले आणि श्यामला देवाची फुले काढण्यास सांगितले. माझे तळवे ओले आहेत. त्याला माती लागेल, तुझ्या ओच्याला पूस म्हणून श्याम हटून बसला. आईने लुगडे धोंडीवर पसरले. श्यामचे पाय कोरडे झाले. आईचे

लुगडे ओले झाले.

घरात गेल्यावर आई देवाजवळ दिवा लावता लावता श्यामला म्हणाली, ''श्याम पायाला घाण लागू नये म्हणून जपतोस तसाच मनाला घाण लागू नये म्हणून जप हो.. देवाला सांग शुद्ध बुद्धी दे ! शरीरास व कपड्यास मळ लागू नये म्हणून सर्वजण जपतात; परंतु मी अजून शुद्ध निष्पाप होत नाही म्हणून कोणी तळमळतो का ? अजून माझे मन घाणीत बरबटलेले आहे. असे मनात येऊन कितीकांस वाईट वाटते ?

## पत्रावळ

कोकणात पुष्कळशा घरी पत्रावळीवर जेवण्याची पद्धत होती. शेतीच्या कामधामात ताटे घासावयास त्रासाचे होई. पत्रावळीसाठी पाने शेतावरून घरी आणली जात. सकाळी दहाच्या सुमारास वडीलांची स्नान संध्या सुरू झाली की, शाळेतून आलेली मुले पत्रावळी लावावयास बसत. कोकणात एक म्हण आहे. पत्रावळी आधी द्रोणा, तो जावई शहाणा! द्रोण कठीण. तो ज्याला पत्रावळी लावण्यापूर्वी लावता येतो तो जावई शहाणा असलाच पाहिजे. वड, पळस, कुडा, धामण, पांढरा चाफा, भोकरी, अशा विविध झाडांच्या पानांचा पत्रावळीकरीता उपयोग होतो.

आजी प्रत्येकाला पत्रावळी किती लावायच्या ते नेमून देई. श्यामला प्रथम पत्रावळ लावता येत नसे. प्रत्येकाने आपली पत्रावळ लावून आणायची आणि जेवावयास बसण्याचे ठरले. प्रत्येकाने पत्रावळ आणली. श्यामने पत्रावळ लावली नाही. आईने श्यामचे पान वाढले नाही.

थोड्या वेळाने मोठी बहीण अक्का हिने श्यामची समजूत घातली. पत्रावळ लावायला शिकवते. सासरी गेले की इतक्यात येणार नाही, असे म्हणाली. श्यामने रागारागाने पत्रावळ लावली. टाके नीट बसले नाही. जेवताना एक टाका घशाशी अडकला. आपण पत्रावळ नीट न लावल्याने त्याचे प्रायश्चित म्हणून हा टाका लागला. श्यामला कळून चुकले. श्यामने दुसऱ्या दिवसापासून चांगल्या पत्रावळी लावण्याचा निश्चय केला. श्याम पत्रावळी उत्तम लावू लागला.

## श्यामच्या आईचे मातृहृदयी संस्कार

संध्याकाळचे चार-पाच वाजण्याची वेळ होती. सुट्टी असल्याने श्याम घरीच होता. आई देवदर्शन घेऊन घरी आली.

''आई मी जाऊ का बाहेर मित्रांकडे?''

''श्याम तू जा परंतु तुला एक काम सांगते, ते आधी कर, बाळदादांच्या कवादीपुढे एक म्हातारी बसली आहे. तिच्या डोक्यावरचा गोयला खाली पडला आहे. आजारी अशक्त दिसत आहे. कोणी येईल महारवाडयातून तेव्हा तिच्या डोक्यावर गोयला मिळेल. श्याम तिच्या डोक्यावर मोळी दे. नंतर घरी ये, मी तुला आंघोळ घालीन.''

तो काळ फार पूर्वीचा, पहातील, हसतील, नावे ठेवतील ही श्यामला भीती! परंतु आईचे काम करावयाचे ठरविले. श्याम त्याच रस्त्याने म्हातारीपर्यंत पोहोचला. ''काय गं डोक्यावर का द्यायला हवी मोळी ? मी देतो'' असे श्याम म्हणाला. ''नको रे दादा, तुम्ही बामणं, पाह्यलं तर मारतील मला'' म्हातारी म्हणाली.

''अगं मी घरी गेल्यावर आंघोळ करीन हो, घे!'' असे म्हणून श्यामने तिच्या डोक्यावर मोळी चढविली. लाकडाच्या लहान मोळीला गोयला असेही म्हणतात. रस्त्याने पहाणारी मंडळी श्यामला टोचून बोललीच.

''मी घरी जाऊन आंघोळ करणार आहे. म्हातारीला नदीतून पलीकडे जावयाचे आहे. काळोख होईल'', श्याम म्हणाला.

श्यामच्या आईने श्याम करवी गोयलेवालीला हाक मारली आणि तो गोयला विकत घेतला. श्यामकडून भाताच्या कणगीतून भात काढून आणवून तिला दिले.

''तापाने आजारी आहेस का?''आई म्हणाली, ''व्हय माय ताप लई येतो काय करतावं. पोटाला हवं ना!'' म्हातारी म्हणाली.

श्यामच्या आईने पत्रावळीवर तिला भात दिला. प्यायला पाणी दिले. ''आई देव तुमचे भले करो. गरिबाचे दुनियेत कुणी नाही, बघा!'' म्हातारी दीनवाणी बोलली. खऱ्या अर्थाने एक आत्मा समाधानी झाला होता. आपण सर्वच देवाची लेकरं आहोत. एकमेकांचा विचार केल्यावर देव किती आनंदीत होत असेल.

## स्वावलंबी शिक्षण

(गुरुजींचे) श्यामचे प्राथमिक शिक्षण पालगडला झाले. पुढील शिक्षणाकरीता पुण्यास मामाकडे ठेवण्यात आले. तिथे त्यांचे मन रमेना. पुण्याहून ते आपल्या घरी पालगडला आले आणि दापोलीच्या मिशनच्या शाळेत शिक्षणासाठी जाऊ लागले. पाठांतर जबरदस्त होते. शाळेमध्ये 'हुशार विद्यार्थी तसेच 'कवी' अशी त्यांची किर्ती

पसरली. शामने प्राकृत पुराणादी पोथ्यांचे वाचन केले होते. घरातील आर्थिक स्थिती हलाखीची होत चालली होती. ''बडे घर पोकळ वासा!'' अशी स्थिती होती. श्यामच्या मोठ्या भावाने नोकरी धरली होती. औंध संस्थानात गरीब विद्यार्थ्यांना मोफत अन्न मिळते असे मित्रांकडून श्यामला समजले. श्याम औंधला शिक्षणाकरीता गेला. शिक्षणासाठी तेथे खडतर हालअपेष्टा सोसल्या. माधुकरी मागितली. शिळेपाके तुकडे खाऊन, त्यावर दिवस काढले. कधी काकडी खाऊन तर कधी ओळखीच्या गिरणवाल्याकडून मिळणाऱ्या पिठावर आपली गुजराण केली. पण ज्ञानोपासना सोडली नाही. दुर्दैवाने औंधला प्लेगची साथ सुरू झाली. त्यामुळे श्याम पालगडला परत आला. श्यामने शिक्षण चालूच ठेवले. कधी डाळ चुरमुरे खाऊन दिवस काढावेत. तर कधी एक वेळ जेवून राहावे. शेवटी काही ठिकाणी वार मिळाले. अशा खडतर हालअपेष्टा सोशीतच श्याम १९१८ साली मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाला.

घरातील दारिद्र्य वाढतच होते. वडीलांना सावकाराचे कर्ज झाले. शेवटी घराचा लिलाव झाला. श्यामची आई खचून गेली. तिने अंथरुण धरले. त्यातच तिचा अंत झाला. श्यामला मनस्वी दुःख झाले.

श्यामने मॅट्रिक झाल्यावर पुढे शिकावयाचे ठरविले. श्यामने न्यू पूना कॉलेज (एस. पी. कॉलेज) मध्ये आपले नाव दाखल केले. तिथून ते बी.ए. व एम.ए. च्या परीक्षा उत्तीर्ण झाले. पुढे काय करावे या विचारात असताना नोकरीची जाहिरात वाचली. अर्ज केला आणि अमळनेरच्या तत्त्वज्ञान विद्यापिठात 'फेलो' पदाची नोकरी मिळाली. तिथून ते अमळनेरमधील शाळेत 'शिक्षक' म्हणून गेले. थोड्याच दिवसात तेथील वसतिगृहाचे ते मुख्य झाले. तेथील विद्यार्थ्यांच्या जीवनाशी ते समरस झाले.

मुलांनो येणाऱ्या अडचणींशी झुंज देत, मार्ग काढीत परिस्थितीवर मात करून श्याम एक 'उत्तम शिक्षक' बनला.

## मातृभूमीची हाक

१९२१ पासून महात्माजींच्या राजकीय आंदोलनाचा परिणाम गुरुजींवर होत होता. गुरुजींनी खादी वापरण्यास सुरुवात केली. परदेशी माल वापरावयाचा नाही हे ठरविले. १९३० साली सत्याग्रह सुरू झाला. गुरुजींनी खानदेशात प्रचारास सुरुवात केली. गुरुजींना अटक झाली. तुरुंगात गुरुजींना विनोबा भावे भेटले. तुरुंगात विनोबांची गीतेवर प्रवचने

होत असत. गुरुजी ती प्रवचने लक्षपूर्वक ऐकत असत. विनोबांची गुरुजींवर अतिशय श्रद्धा बसली. गुरुजी तुरुंगात चक्की पिसण्याचे काम आनंदाने करत. २३ मार्च १९३१ ला गुरुजी तुरुंगातून सुटले. १९३२ पासून १९३४ सालापर्यंत दोन वर्ष ते पुण्यात होते. १९३६ साली काँग्रेसने खेड्यात अधिवेशन भरविण्याचे ठरविले. फैजपूरची निवड केली. गुरुजींनी हे अधिवेशन यशस्वी व्हावे म्हणून जिवापाड मेहनत घेतली. गुरुजींच्या हस्ते तेथे स्वातंत्र्य ज्योत नेण्यात आली. याच अधिवेशनात काँग्रेसने असेंब्लीच्या निवडणूका लढविण्याचे ठरविले. सारा देश काँग्रेसच्या पाठीमागे आहे हे सिद्ध करण्यासाठी काँग्रेस कार्यकर्ते झटू लागले. खानदेशाच्या खेड्यापाड्यातून काँग्रेसचा संदेश पोहोचविण्याचे काम गुरुजींनी केले.

१९३८ साली गुरुजींनी काँग्रेस या नावाने साप्ताहिक सुरू केले. महायुद्ध १९३९ साली सुरू झाल्यानंतर देशातील घडामोडी प्रचंड वेगाने घडून येऊ लागल्या. काँग्रेस मंत्रीमंडळाने राजीनामे दिले. ब्रिटीश सरकारने ९३ कलमी कारभार सुरू केला. असंतोषाचे वारे वाहू लागले. याच सुमारास गुरुजींनी काँग्रेसचे १ लाख सभासद महाराष्ट्रात व्हावे म्हणून उपोषण केले. १९३८ साली पिके बुडाल्याने सारामाफीसाठी शेतकऱ्यांची परिषद भरविली. काँग्रेस युवक परिषद १९४० साली चांदवड येथे भरली. गुरुजींना सरकारकडून अटक झाली. १९४२ चा ‘चले जाव’ लढा सुरू होईपर्यंत गुरुजी तुरुंगातच होते. १० ऑगस्ट १९४२ ला गुरुजींना सोडण्यात आले.

गुरुजी भूमीगत होऊन चळवळी नेटाने चालविण्याचा प्रयत्न करीत होते. गुरुजींना १९४३ पुन्हा अटक झाली व त्यांना येरवड्याच्या तुरुंगात ठेवण्यात आले. इतर सर्व पुढाऱ्यांबरोबर त्यांची १९४५ साली मुक्तता झाली. काँग्रेस, मुस्लीम लिग आदी पक्षांबरोबर ब्रिटीश सरकारने वाटाघाटी सुरू केल्या. स्वांतत्र्याचा उषःकाल आला तरी देशातील भेदाभेद दूर झाले नाहीत. याबद्दल गुरुजींना वाईट वाटले. पंढरपूरचे देऊळ हे हरिजनांना अद्याप खुले नव्हते. साने गुरुजींनी सहा महिने आपल्या ओजस्वी वाणीने हे मंदिर हरिजनासाठी उघडण्यासाठी महाराष्ट्रभर प्रचार केला. जनमताची पर्वा न करता बडव्यांनी हरिजनांना मंदिर बंदच ठेवले. गुरुजींनी आमरण उपोषण सुरू केले. पुढे दादासाहेब मावळणकरांच्या मध्यस्थीने मंदिराचे दरवाजे हरिजनासाठी खुले झाले व पांडुरंगाचे दर्शन सर्वांना घेता येवू लागले. भारतात अनेक वाटाघाटी होऊन अखेर

फाळणी होऊन स्वातंत्र्य प्राप्त झाले. देश स्वतंत्र झाला. भारतमातेची गौरव गीते सर्वकडे निनादू लागली.

## गुरुजी' चे वाङ्मय

गुरुजींनी विपुल वाङ्मय लिहीले आहे. कादंबऱ्या, लेख, निबंध, काव्य, चरित्रे, नाट्य-संवाद, इ. साहित्याच्या विविध क्षेत्रांत त्यांची लेखणी अविरत चालत होती. त्यांच्या वाङ्मयातून कळकळ, स्नेह, प्रेम इ. गोष्टीचा वर्षाव झालेला आहे. भाषेला एक प्रकारची धार आहे. ओज आहे, त्यांची साधीसोपी भाषा सर्वांना आवडली. गुरुजींनी आपले सर्व लेखन समाजोद्धारार्थ लिहीले. त्यांच्या मनात राजकीय, सामाजिक व शैक्षणिक विषयासंबंधी जे विचारांचे, भावनांचे कल्लोळ उठले ते ते सर्व त्यांनी आपल्या लेखणीच्याद्वारे प्रकट केले. केवळ कला म्हणून आपले वाङ्मय नटविले नाही. स्वतःला आलेले अनुभव व समाजाविषयीचे विचार आपल्या लेखनातून प्रकट केले. बालकांना त्यांनी गोड गोष्टी सांगितल्या. गुरुजींच्या गोड गोड गोष्टी १ ते १० भाग, खरा मित्र, घामाची फुले, मनूबाबा, जिव्हाळा, दुःखी, चित्रा आणि पारू इ. दहा भाग आहेत. जिव्हाळा, ध्येय, ध्येयनिष्ठा प्रकट करणाऱ्या हृदयस्पर्शी करुणरम्य अशा कथा आहेत.

कुमारांच्यासाठी ध्येय दर्शविणारे मार्गदर्शक साहित्य, चरित्रे आदि लिहीली. दिगंबर राय, जिवनाचे शिल्पकार, भारतीय नारी, लोकमान्य टिळक, आपले नेहरू अशा प्रकारची चरित्रे लिहीली. कुमारापुढील कार्य, आव्हाने, हिमालयातील शिखरे, विचारगाथा, ध्येयदर्शविणारे साहित्य लिहीले.

गुरुजींचे वाङ्मय सर्वांसाठी व आबालवृद्धांसाठी आहे; सुंदरपत्रे (भाग १ ते ३), भगवान श्रीकृष्ण, मोरी गाय, श्री शिवराय, साक्षरतेच्या कथा, दारुबंदीच्या कथा, आपण सारे भाऊ, स्वर्गीय ठेवा, अमोल गोष्टी, विश्वदर्शन, साने गुरुजी अशी विविध पुस्तके लिहीली आहेत. विपुल वाङ्मयातील तेजस्वी रत्ने, म्हणजेच 'श्याम' व 'श्यामची आई' ही पुस्तके होत. कर्म, भक्ती व ज्ञान या तिन्ही मार्गाचा अचूक मेळ घालून, सानेगुरुजींनी त्यांचे विचार समाजापुढे मांडले. लहान मुले म्हणजे देवाघरची फुले, उद्याचे भावी नागरिक, देशाचे आधारस्तंभ. या मुलांवर वाईट संस्कार होऊ नयेत म्हणून त्यांना बोधप्रत गोष्टी सांगून त्यांचे मनावर, विचारांवर, आणि वागण्यावर चांगले परिणाम होण्यासाठी ते अहोरात्र झटले. त्यांच्या विचाराला आचाराची संगत होती. **'खरा तो एकची धर्म जगाला**

**प्रेम अर्पावे**' हा मानवी मंत्र जगाला दिला. परमेश्वरावरील अपार श्रद्धा, पिडीतांविषयीचा कळवळा 'जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले' ही तुकारामांची उक्ती त्यांना लागू होते. 'जगात दुसऱ्याला हसण्याइतके सोपे नाही व दुसऱ्यासाठी रडण्याइतके कठीण काम नाही. 'हे त्यांचे विचार.

## खरा मातृभक्त

साने गुरुजींच्या एकंदर वाङमयातून व लिखाणांतून मातृप्रेमाबद्दल विचार थोर आहेत. आई पंचप्राणांचे पांघरुण घालून मुलाचा सांभाळ करते. स्वतः उपाशी राहून त्याला वाढविते. स्वतः मरून मुलाला जगविते. आई ह्या शब्दामध्ये सानेगुरुजींनी मायेचा सागर पाहिला, आईमध्ये त्यांनी कोमलता, रमणीयता, निर्मलता, कठोरता व  क्षमता ही पाहीली. साने गुरुजींनी आईमध्ये शक्ती, आज्ञा, सेवा, शिस्त, सामवेद, आयुर्वेद, सृष्टीशास्त्र, प्रेम व वात्सल्याचा झरा पाहिला व अनुभवला.

## गुरुजींचे स्वप्न आंतरभारती

भारत देश स्वतंत्र झाला. अनेक घटक राज्यांचा बनलेला देश. देशातील प्रांतीयता तशीच होती. प्रांता-प्रांतातील हेवादावा अद्यापही नष्ट झालेला नाही. प्रांतीयता ही भारताच्या एकत्त्वाला बाधक ठरणार असे दिसू लागले. प्रांताप्रांतातील द्वेष नाहीसा होऊन सर्वत्र बंधूप्रेमाचे वारे वाहावेत असे सर्वांनाच वाटत होते. यासाठी आंतर भारतीचा प्रयोग करून पाहण्याचे गुरुजींनी ठरविले. निरनिराळ्या प्रांतातील भाषा शिकू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची सोय हवी. यासाठी पैसा उपलब्ध होणे आवश्यक आहे. रविंद्रनाथ टागोरांच्या शांतिनिकेतनाप्रमाणे गुरुजींनी आपली मनीषा व्यक्त केली होती. आपली मनीषा पूर्ण होण्याकरीता गुरुजींनी काही पैसाही गोळा केला होता पण कार्य अपुरे असतानाच, निगर्वी स्वभाव, प्रेमळवाणी व अखंड सेवा, याने भरलेला हा अमृतघट त्यांना स्वतःच्या हाताने फोडावा लागला. दिनांक ११ जून १९५० ला गुरुजींचे देहावसान झाले. गुरुजींच्यापुरते ते स्वप्नच ठरले. 'भारतमातेचा एक तेजस्वी सुपुत्र अनंतात विलीन झाला!'

❖❖❖

## साने गुरुजींचा संक्षिप्त जीवनपट

| | |
|---|---|
| **जन्मतारीख २४ डिसेंबर १८९९ :** | जन्मगाव पालगड ता. दापोली जिल्हा रत्नागिरी, |
| **१९१२ ते १९१६ :** | दापोलीच्या शाळेतून इंग्रजी पाचवीपर्यंतचे (सध्याच्या ९वी पर्यंतचे शिक्षण औंध सांगली येथील शाळेत इंग्रजी सहावी पहिल्या सहामाहीपर्यंत शिक्षण, प्लेगच्या साथीमुळे शाळा बंद झाल्याने पालगडला परतणे. |
| **१९१६:** | धाकटा भाऊ सदानंदाचे पुण्यात प्लेगने निधन. |
| **२ नोव्हेंबर १९१७ :** | आई यशोदाबाई यांचे निधन. |
| **१९१७ – १८ :** | पुण्यातील नूतन मराठी विद्यालयातून शिक्षण व १९१८ मध्ये मॅट्रिक उत्तीर्ण. शाळामित्र राम जोशी यांच्या घरी आश्रय घेऊन व वार लावून शिक्षण घेतले. |
| **१९१८ ते १९२२ :** | पुण्यातील न्यू पूना कॉलेजमधून (सध्याचे सर परशुराम भाऊ कॉलेज ) महाविद्यालयीन शिक्षण घेतले. |
| **१९२२ :** | संस्कृत व मराठी विषय घेऊन बी.ए (ऑनर्स) उत्तीर्ण. |
| **१९२१:** | महात्मा गांधीच्या असहकार आंदोलनात भाग घेऊन पंधरा दिवस कॉलेजचा त्याग. पण नंतर शिक्षण सुरु केले. |
| **१९२३ जुलै:** | अमळनेर येथील तत्वज्ञान मंदिरात फेलो म्हणून दाखल. |
| **२४ डिसेंबर १९४६ :** | पुणे येथील कुमार साहित्य संम्मेलनाचे अध्यक्ष 'कुमारांचे गांधी' असा सन्मान व एक हजार रूपयांची गुरूदक्षिणा .. |
| **४ नोहेंबर १९४६ ते १० मे १९४७ :** | पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरातील हरिजन प्रवेशाचे |

| | |
|---|---|
| | आंदोलन. विठ्ठल मंदिर हरिजनांस खुले झाले. |
| **१९४७ :** | श्री. प्रकाश मोहाडीकर व इतर यांनी सुरू केलेल्या प्रदीप मासिकाचे संपादन काही काळ गुरुजींनी केले. |
| **२६ ऑक्टोबर १९४९ :** | मुंबई सरकारच्या शिक्षक विद्यार्थ्यांच्या स्वातंत्र्यावर बंदी घालणाऱ्या फर्मानाचा निषेध म्हणून गुरूजींची प्राणंतिक उपोषणाची घोषणा, सरकारने २२ डिसेंबर १९४९ रोजी फर्मान मागे घेतले. |
| **२४ डिसेंबर १९४९ :** | गुरूजींच्या पन्नासाव्या वाढदिवसानिमित्त मुंबईत शिवाजी पार्कवर सत्कार. अध्यक्ष सेनापती बापट. |
| **३० जानेवारी १९५० :** | गुरूजींची साबरमती आश्रमास भेट. |
| **११ जून १९५० :** | रविवारी पहाटे चार वाजता निधन. |

❖❖❖

# भारतीय असंतोषाचे जनक...
# लोकमान्य बाळ गंगाधर टिळक



**स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच! अशा प्रकारची भिष्म प्रतिज्ञा करणारे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक हे भारतीय स्वातंत्र्य संग्रामाचे आद्य राजकारणी पुरुष म्हणून ओळखले जातात. ब्रिटीश राजसत्तेच्या विरोधात १८५७ साली प्रचंड मोठा असा सशस्त्रसंग्राम भारतीयांनी दिला. या संग्रामाच्या वेळी लोकमान्य केवळ एक वर्षाचे होते.**

लोकमान्य टिळकांचे मूळ गाव रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यातील चिखलगाव. हे गाव इतिहास प्रसिद्ध दाभोळ बंदर, हर्णे बंदर, तामस तीर्थ यांच्या सानिध्यात आहे. स्त्री शिक्षणाचे जनक धोंडो केशव कर्वे, रँगलर परांजपे, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, काळे, एव्हरेस्टवीर सुरेन्द्र चव्हाण, कान्होजी राजे आंग्रे, अशा नरवीरांची जन्मभूमी म्हणजे दापोली तालुका.

दि. २३ जुलै १८५६ रोजी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचा जन्म झाला, आईचे नाव पार्वतीबाई, वडिलांचे नाव गंगाधरपंत. कडक सुर्योपासना केल्याने पुत्रप्राप्ती झाली. टिळकांचे कुलदैवत केशवराज. त्यामुळे नाव ठेवले केशव ! मात्र कालांतराने बाळ हेच नाव रुढ झाले.

‘स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी’ या उक्तीप्रमाणे बालपणीच

लोकमान्यांची आई स्वर्गवासी झाली. दहा वर्षांचे असताना वडील गंगाधरपंतांची बदली पुणे येथे झाली व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक हे पुण्यास आले. सोळाव्या वर्षी मॅट्रीक परिक्षा पास होऊन टिळक डेक्कन कॉलेजात दाखल झाले. कॉलेज जीवनात वस्तीगृहात रहावे लागले. अनेक प्रकारचा मित्र परिवार मिळाला. १८७६ मध्ये बी.ए.ची पदवी मिळाली. नंतर कायद्याचा अभ्यास सुरु केला.

विष्णू शास्त्री चिपळूणकर, श्रीमंत भाऊसाहेब रंगारी, महात्मा फुले, गोपाळ गणेश आगारकर, वासुदेव बळवंत फडके हे टिळकांचे समकालीन. पुण्यात त्यावेळी लहुजी वस्तादाचा आखाडा प्रसिद्ध होता. हा व्यायामाचा केवळ आखाडाच नव्हता तर तेथे स्वातंत्र्य चळवळीच्या योजना आखल्या जात असत.

ब्रिटीश राजसतेने आर्थिक शोषणाबरोबरच सांस्कृतिक क्षेत्रातही आक्रमण चालू केले होते. सत्तेच्या जोरावर हिंदुच्या आदर्शावर आघात करण्याचे चाललेले प्रयत्न हा चिंतेचा व चर्चेचा विषय ठरत होता अशा वेळी निबंधकार विष्णू शास्त्री चिपळूणकर, आगारकर, टिळक यांनी १ जाने १८८० रोजी न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना केली. शिक्षणासोबतच राष्ट्रीय प्रबोधनासाठी वृतपत्रांची आवश्यकता आहे हे पटल्यामुळे दि. २ जाने १८८१ रोजी केसरी व ४ जाने १८८१ रोजी मराठा (इंग्रजी माध्यम) ही साप्ताहिक वृत्तपत्रे चालू केली. मराठी भाषेतून चालणाऱ्या केसरीचे संपादन स्वतः टिळक करीत तर इंग्रजी माध्यमातून प्रकाशित होणाऱ्या मराठाचे संपादक गोपाळ गणेश आगारकर हे होते.

टिळक व मित्र मंडळीने चालविलेल्या न्यू इंग्लिश स्कूलच्या प्रगतीमुळे संस्थेत आश्रयदात्यात मुंबईचे गव्हर्नर सर जेम्स फर्ग्युसन हे दाखल झाले. दि. २ जाने. १८८५ मध्ये पुण्यात फर्ग्युसन कॉलेजची स्थापना झाली.

टिळक स्वभावत: जहाल मतवादी होते. अगोदर स्वातंत्र्यप्राप्तीचे प्रयत्न व त्यासोबतच समाजसुधारणा अशी टिळकांची धारणा होती. मात्र गोपाळ गणेश आगरकर हे अगोदर समाज सुधारणा आणि समाजसुधारणेनंतरच स्वातंत्र्य अशा धोरणाचे होते. याचाच परिणाम म्हणजे गोपाळ गणेश आगारकरांनी 'सुधारक' नावाचे वृत्तपत्र सुरु केले. केसरी व मराठा ही वृत्तपत्रे टिळकांच्या मालकीची

झाली.

ब्रिटीश राजसत्तेला या देशात राज्य करण्यांतील प्रमुख अडचण होती ती येथील सामाजिक बंधुभावाची! या सामाजिक बंधुभावाला सुरुंग लावत हिंदु-मुस्लिम दंगली घडून आल्यास ब्रिटीशांचा हेतू साध्य होणार होता.

टिळकांनी महाराष्ट्रात सामाजिक बंधुभाव निर्माण करण्यासाठी प्रभावी संघटनाचे हत्यार उपसले. सार्वजनिकरित्या गणेशोत्सवाच्या माध्यमातून पुण्यात सुरु संघटनात्मक कार्य केले.

शिवछत्रपतींच्या बाबतची राष्ट्रीय भावना स्वातंत्र्य लालसेबाबतची जनतेची प्रतिक्रिया, समाजातील तळागाळातील बहुजन समाजाला राष्ट्रीय प्रवाहात आणण्यासाठीची दूरदृष्टी यांचा परिपाक म्हणजे १८९६ साली शिवजयंती उत्सवास टिळकांनी राष्ट्रीय उत्सवाचे स्वरूप दिले.

सार्वजनिक गणेशोत्सव, शिवजयंती उत्सव, स्वातंत्र्यप्राप्तीसाठीची होणारी विविध प्रबोधने, स्थानिक वासुदेव बळवंत फडके यांच्यासारख्यांनी केलेले उठाव, भारतभर ब्रिटीश विरोधात चालणाऱ्या घडामोडी, समाजसुधारकांचे प्रयत्न यामुळे सहाजिकच ब्रिटीश राज्यसत्ता दिवसेंदिवस दडपशाहीकडे झुकू लागली होती. १८९६ साली तर महाराष्ट्रात दुष्काळ पडला. भरीस भर म्हणजे रैंड नावाचा जुलमी कलेक्टर पुण्यात नेमणूकीस आला. त्याने सार्वत्रिक अत्याचाराचे तंत्र चालू केले. जनता प्लेगच्या साथीने ग्रासलेली, रँडचे सैनिक भरदिवसा जनतेवर अन्याय अत्याचार करीत, रस्त्यारस्त्यातून महीलांची विटंबना केली जात होती. अशा वेळी अन्यायाचा प्रतिशोध घेणारे चाफेकर बंधू पेटून उठले व एक दिवस त्यांनी जुलमी कलेक्टर रँड याला सरळ सरळ गोळ्या घालून ठार केले. रॅन्डचा वध करणारे चापेकर बंधू हे टिळकांच्या समाजप्रबोधन चळवळीने राष्ट्रकार्यास प्रवृत्त झालेले शूर वीर होते. याच वेळेस टिळकांनी जुलमी कलेक्टर रँडच्या अत्याचारास अनुसरून ''सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?'' आणि ''राज्य करणे म्हणजे सुड उगवणे नव्हे'' असे दोन अग्रलेख लिहीले. याचा परिणाम म्हणजे सामाजिक चिथावणी दिल्याचा आरोप ठेवून सरकारने टिळकांवर राजद्रोहाचा खटला भरला. १८९७ मध्ये अटक केली. अठरा

महिन्याची तुरुंगवासाची शिक्षा झाली. या काळात टिळकांनी ''आर्क्टिक होम इन द वेदाज'' हा संशोधनात्मक निबंध लिहीला. ६ डिसें. १८९८ रोजी टिळक पुनः राजकारणात प्रवेशले. यावेळी त्यांनी लिहीलेला अग्रलेख होता ''पुनश्च हरी ॐ''

## टिळक आणि काँग्रेस

राष्ट्रीय काँग्रेसच्या जन्मापासूनच टिळकांचा काँग्रेसशी घनिष्ठ संबंध होता. १८९१ साली नागपूरच्या अधिवेशनात शस्त्रबंदी कायद्याबाबतचा ठराव टिळकांनी मांडला. टिळकांचे कार्य गतीशील होते, जहालमताचे होते. मात्र काँग्रेसला टिळकांचा वेग बऱ्याच वेळा मानवणारा नव्हता. अर्थात केवळ टिळकांच्या प्रखर राष्ट्रीय, जहालमतांमुळे काँग्रेसमध्ये जहाल व मवाळ असे दोन प्रवाह निर्माण झाले. १९०५ मध्ये कर्झन वायलीने बंगालची फाळणी केली. यावर टिळकांची प्रतिक्रिया अत्यंत तीव्र होती. त्यांनी सरळसरळ बहिष्काराचा घोष केला. परदेशी मालावर बहिष्कार, स्वदेशी, स्वराज्य आणि राष्ट्रीय शिक्षण या चतुःसुत्रीचा महामंत्र याचवेळी जनतेसमोर आला.

बंगालची फाळणी व त्यावरील टिळकांचे आक्रमक धोरण हे संपूर्ण राष्ट्राने प्रतिष्ठेचे मानले. ब्रिटीश विरोधात फार मोठ्या प्रमाणात असंतोषाचा उद्रेक करण्यात यावेळी टिळक यशस्वी ठरले. ''लढ, झगडा, पण भीक मागू नका'' या घोषणेस प्रतिष्ठा मिळाली. संपूर्ण भारतात लाला लजपतराय, बिपीनचन्द्र पाल, बाळ गंगाधर टिळक अशी लाल, बाल, पाल ची त्रिमूर्ती प्रसिद्धीस पावली. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी दि. १९०५ रोजी पुण्यांत केलेल्या विदेशी कापडाच्या होळीला टिळकांचा सक्रिय पाठिंबा होता. पंडित शामजी कृष्ण वर्मा या लंडनमधील कांतिवीरास शिफारसीचे पत्र पाठवून स्वातंत्र्यवीर सावकरांस छत्रपती शिवाजी शिष्यवृत्ती देण्याबाबतची शिफारस ही टिळकांनीच केलेली होती.

## ६ वर्ष काळेपाणी

यानंतर १९०७ चे सुरतचे अधिवेशन जहाल व मवाळांच्या वादानेच गाजले. १९०८ साली सरकारने दडपशाहीचा पुरस्कार करणारे कायदे करण्याचे

धोरण चालू केले. टिळकांनी २४ जुलै १९०८ रोजी **देशाचे दुर्दैव** या नावाचा लेख लिहीला. परिणामी टिळकांना अटक झाली. न्यायमूर्ती डावर यांनी टिळकांचा अर्जही फेटाळला. अशा वेळी स्वतःचा बचाव स्वतःच करावयाचा असे धोरण टिळकांनी स्विकारले. सात युरोपिय आणि दोन भारतीय ज्युरींसमोर खटला सुरु झाला. सतत पाच दिवस टिळकांनी बचाव केला. हा खटला इतिहासात अत्यंत गाजला. ब्रिटीश राजसत्ता न्याययंत्रणेला कशा पद्धतीने राबवून घेते व न्याय कसा विकत घेतला जातो, न्यायालयात अन्याय कसा केला जातो याचे मुर्तीमंत उदाहरण म्हणजे टिळकांचे विरोधात चाललेला हा न्यायमूर्ती डावर यांचे समोरील खटला. निकालापूर्वी न्यायमूर्तींनी टिळकांना विचारले तुम्हाला काही सांगावयाचे आहे का ? लोकमान्यांनी यावेळी दिलेले उत्तर अत्यंतिक बाणेदारपणाचे असून आपल्या भारतीय संस्कृतीच्या वारशास साजेसे असेच आहे असे म्हणावे लागेल. टिळक म्हणाले, **ज्यूरींचा निर्णय काहीही असला तरी मी निरपराध आहे, वस्तुजातीच्या भवितव्यतेवर सत्ता गाजविणाऱ्या उच्चतर शक्ती अस्तित्वात आहेत आणि स्वतंत्र रहाण्यापेक्षा हालअपेष्टांनीच मी घेतलेले कार्य अधिक उर्जितावस्थेला यावे अशीच त्या विधात्याची इच्छा असेल.**

या खटल्याचा निकाल टिळकांच्या विरोधात होणार हे पूर्वीपासून ठरलेलेच होते. सहा वर्षे काळ्या पाण्याची शिक्षा व एक हजार रुपये दंड..! या खटल्यातील शिक्षा जाहीर होताच संपूर्ण मुंबईत हरताळ पाळण्यात आला. सहा वर्षांच्या शिक्षेसाठी सहा दिवस बंद पाळण्यात आला. टिळकांना ब्रह्मदेशातील मंडालेच्या तुरुंगात पाठविण्यांत आले, तेथील हवामानाचा प्रतिकूल परिणाम त्यांचेवर झाला. मधुमेहाचा विकार बळावला. या तुरुंगवासाचे काळात टिळकांनी फ्रेंच, पाली, जर्मन, आदी भाषांचा अभ्यास केला. अविरत चिंतन, मनन, वाचन करून ‘‘**गीता रहस्य**’’ हा ग्रंथ लिहिला. हिंदुचे धार्मिक तत्त्वज्ञान आणि मानवी प्रेरणांची, मानसिकतेची पाश्चात्य तत्त्वज्ञानाशी तुलना या ग्रंथात केलेली आहे. दि. १६ जून १९१४ रोजी टिळकांची मंडालेच्या कारागृहातून मुक्तता झाली. पुनः एकवार टिळकांनी स्वतःला सार्वजनिक कार्यात झोकून दिले. दि. २८ एप्रिल १९१६ रोजी टिळकांनी होमरुल लिगची घोषणा बेळगाव येथे

केली. सनदशीर मार्गाने ब्रिटीशांकडून स्वातंत्र्यप्राप्ती करून घेणे हा या मागील उद्देश होता. मद्रासच्या ॲनी बेंझट यांचा या चळवळीला पाठींबा मिळाला. टिळकांचे विविधांगी उपक्रम हे स्वातंत्र्यप्राप्तीच्या दिशेने जनसामान्यां पर्यंत रुजत होते. १९१६ च्या लखनौ काँग्रेसच्या अधिवेशनात टिळकांनी ब्रिटीश राजसत्तेवर घणघणाती आघात करण्याच्या आपल्या धोरणाचा पुनरुच्चार करीत ''स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच'' असा महामंत्र जगाला दिला. सर व्हॅलेंटाइन चिरोल याने 'इंडियन अनरेस्ट' या पुस्तकात टिळकांची बदनामी करणारी विधाने घातली त्यामुळे टिळकांनी त्या लेखकास कायदेशीर नोटीस दिली. मते मांडण्यासाठी टिळकांना इंग्लंडला जावे लागले. ब्रिटीशांनी अशा प्रकारे टिळकांना अनेकदा मनस्ताप करून घेण्यास भाग पाडल्याची अनेक उदाहरणे आहेत.

टिळक १९२० च्या जुलैमध्ये हिवतापाने आजारी पडले. मृत्युसमयी टिळकांचे वास्तव्य मुंबईच्या सरदारगृहात होते. ३१ जुलै १९२० रोजी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक स्वर्गवासी झाले. भारतीय असंतोषाचे जनक. थोर तत्वचिंतक, आधुनिक भारताचे शिल्पकार, स्वातंत्र्यवीर सावरकरांचे पाठीराखे, सार्वजनिक उपक्रमांचे जनक, थोर गणितज्ञ, गीता रहस्यकार असे विविधांगी पैलू टिळकांच्या चरित्रांतून दिसून येतात.

# टिळकांची वचने

१) मी आपल्यांतील कीर्तन, पुराणे, प्रवचने इत्यादी जुन्या संस्था उर्जितावस्थेत आणीन व या धर्म प्रचाराच्या जुन्या संस्था काबीज करून मी आपल्या सुशिक्षित, सुसंस्कृत आणि स्वार्थ त्यागी तरुणांना पुराणिक प्रवनकार आणि कीर्तनकार म्हणून देशातील खेड्यापाड्यातील सर्व कानाकोपऱ्यांत मिशनरी म्हणून सोडून, सद्य:स्थितीविषयी लोकांना ओळख करून देईन व लोकशिक्षणाचे काम करीन.

२) श्री. शिवाजी महाराजांची ''गोब्राह्मण प्रतिपालक'' म्हणून ख्याती आहे. पण विचार करा की, त्यांनी काय गोशाळा स्थापन केल्या होत्या की. ब्राह्मण भोजने सुरू केली होती ? यापैकी कोणतीही गोष्ट न करताही शिवाजी महाराजांस गोब्राह्मण प्रतिपालक'' असे म्हणतात. यांतील मर्म काय? देशाची उन्नती करणे यासारखे दुसरे कोणतेही गोरक्षण नाही हे त्यांतील मर्म होय.

३) मार्गातील अनेक अडचणी बाजूला सारून जो पुढे पाऊल टाकतो. त्यालाच यश मिळते. अलीकडच्या तीरावर बसून जो नुसता संकल्प करतो त्याला यश मिळावयाचे नाही.

४) आध्यात्मिक विचारांत मनुष्य कितीही गढून गेला तरी मध्यान्ह टळून गेल्यावर पोटात क्षुधेची टोचणी लागली म्हणजे हे सर्व विचार लटपटतात.

५) नुसती वासना किंवा इच्छा असणे यांत काही दुःख नसून त्यांतील आसक्ती हे दुःखाचे खरे मूळ होय. म्हणून सर्व प्रकारच्या वासना मारीत न बसता, ज्ञात्याने केवळ आसक्ति सोडून सर्व कर्म करावे असा गीतेचा संदेश, सिद्धान्त आहे.

६) मेलेल्या राष्ट्राचे पुनरुज्जीवन करण्यास धार्मिक उत्सवांचा फार उपयोग होतो व जीवंत राष्ट्रांना हे उत्सव म्हातारपणापासून निर्भय ठेवतात.

७) माझ्या प्रत्येक कर्माचे फल मला कधी तरी भोगावे लागेल यासारखी नीतीला उत्तेजक दुसरी कोणतीच कल्पना होणार नाही.

८) ज्याला मोक्षाप्राप्ति पाहिजे असेल त्यास आपल्या देशबांधवांची काळजी केल्याखेरीज गत्यंतर नाही. देश आणि देव हे दोन भिन्न मानणारे जे लोक आहेत ते सर्व प्रकारे धर्मभ्रष्ट आहेत असे मी समजतो.

९) धर्म मन तयार करतो. स्वार्थ त्याग करावयास जो मनोनिग्रह लागतो तो मनोनिग्रह धर्म शिकवील. योगाने अगर धर्माने जर मनोनिग्रह अंगी येईल तर मग मनुष्य नुसात धार्मिक नाही तर उत्तम नागरिक होईल.

१०) लोककल्याणाचे खरे तत्त्व विसरून जाऊन धर्माचा बाह्यविधी आचरण्यात खरे हित नाही.

११) मोठ्या मनुष्याप्रमाणे आपल्यातही ईश्वरी अंश आहे असा दृढविश्वास ठेवून व ओळखून प्रत्येकाने प्रयत्न केला पाहिजे. जितक्या अडचणी अधिक बिकट तितके डोके अधिक खर्च केले पाहिजे.

१२) पृथ्वीवरील सर्व धर्मात अत्यंत सहिष्णु, ज्याने त्याने आपापल्या धर्माने वागावे व सर्वांशी प्रेमाने वागावे असे सांगणारा जर कोणता धर्म असेल तर तो हिंदु धर्म आहे.

१३) देशाबद्दल ज्याला सारखी तळमळ लागून राहिली असेल तोच ज्ञानी होय. गीतेमध्ये सुद्धा सर्व भुतांना आत्मवत् मानील तोच खरा ज्ञानी असे म्हटले आहे.

१४) जुलूम सहन करणे यांत स्वार्थ नाही आणि परमार्थही नाही. ही पशुवृत्ती होय.

१५) देशकार्य हे केवळ बुद्धीवर अवलंबून नसून दिर्घोद्योगावर व स्वार्थ त्यागावर अवलंबून आहे.

१६) अस्पृश्यता ही वैदिक धर्मास संमत नाही.

१७) जी अस्पृश्यता मेल्यावर राहात नाही, जी अस्पृश्यता परमेश्वराचे घरी जाताना आड येत नाही. ती अस्पृश्यता आपण आपल्या समाजात वावरू देणे म्हणजे परमेश्वरांच्या घरी पाप करण्यासारखे आहे.

१८) हिंदू धर्म वेदप्रणीत आहे आणि वेदांमध्ये अस्पृश्यतेला कोठेही थारा नाही. तेव्हा आपल्यापैकी काही जणांस अस्पृश्य लेखणे हा मी देवाचे घरी गुन्हा समजतो. वर्णव्यवस्था ही समाजाचे सोयीसाठी आहे. समाज हा वर्ण व्यवस्थेचे सोयीसाठी नाही.

१९) देशाची स्थिती सुधारण्याचा प्रयत्न करणाऱ्या बायका असोत, ब्राह्मण असोत, ब्राह्मणेत्तर असोत, जो कोणी देशाचे कार्य करावयास पुढे येईल त्याला मी

देवाप्रमाणे मानावयास तयार आहे.

२०) प्रत्यक्ष परमेश्वर जर अस्पृश्यता मानणार असेल तर मी त्याला देव म्हणून मानणार नाही.

२१) अस्पृश्यता हा समाजाला लागलेला रोग घालविला पाहिजे आणि रूढी बदलली पाहिजे.

२२) आपल्या थोर पूर्वजांस विसरून जाऊन कोणतेही राष्ट्र उदयास आले नाही व येणेही शक्य नाही असा जो ऐतिहासिक सिद्धान्त आहे याचेच छत्रपती श्री शिवाजी महाराजांचा उत्सव हे दृश्य स्वरुप होय.

२३) छत्रपती श्री शिवाजी महाराजांचे नांवात जितकी जादू भरलेली आहे तितकी जादू महाराष्ट्रातील दुसऱ्या कोणत्याही राजकारणी पुरुषाच्या नावांत भरलेली नाही.

२४) पशूंस शिक्षण नको. त्यांच्यात जी उपजत बुद्धी असते तिला अनुसरून त्यांची दिनचर्या असते. पशू आपल्या पुढील पिढीबद्दल काळजी करीत नाहीत. परंतु मनुष्याचा विशेष असा आहे की, तो आपला अनुभव पुढील पिढीस देऊन त्या अनुभवाची वाढ करण्यास तिला सांगत असतो. याचेच नाव ''राष्ट्रीय शिक्षण' हे होय.

२५) आपल्या राष्ट्राचा विचार करा. कामास लागा. नुसत्या आहार विहारासाठी मानव जन्म नाही.

२६) इतिहासाचा योग्य उपयोग जाणून त्यापासून बोध घेता येईल. बुद्धीला श्रेयस्कर वळण लागेल व अनुवंशिक संस्कार दृढ होऊन आपली बुद्धी भ्रष्ट होणार नाही. अशाच दृष्टीने इतिहासाचा अभ्यास झाला पाहिजे.

२७) ज्याला इंग्रजीत कॅरेक्टर म्हणतात ते चारित्र्य, दानत राष्ट्रांतील लोकांत असली पाहिजे. त्यांच्यात करारीपणा असला पाहिजे. आणि मी राष्ट्राकरिता मरण्यास देखील तयार आहे. अशी बुद्धि राष्ट्रांतील तरुणांत उत्पन्न झाली पाहिजे, हे ज्या शिक्षणाने होईल ते राष्ट्रीय शिक्षण.

२८) धर्माचे शिक्षण नाही. नीतीचे शिक्षण नाही किंवा उच्च मनोवृत्ती उद्दीपित करणारे शिक्षण मिळत नाही. या शिक्षणाने पोटास भाकर मिळते. सरकारी नोकरी

मिळते, दरबारात खुर्ची मिळते, किताब मिळतो. हे सर्व जरी खरे असले तरी राष्ट्राच्या अंतिम ध्येयाशी तुलना केली असता या गोष्टी क्षुल्लक आहेत.

२९) गरीब परंतु बुद्धिमान विद्यार्थ्यांस अधिक उत्तेजन दिल्यानेच देशात विद्येची अभिवृद्धि जास्त होण्याचा संभव आहे.

३०) शाळेतील शिक्षण जन्मभर पुरत नाही. यास्तव ग्रंथ हेच आपले कायमचे गुरु होत.

३१) प्रत्यक्ष परमेश्वर येऊन ''दारु प्या'' म्हणून सांगू लागला तर त्याच्यावर देखील बहिष्कार टाका.

३२) व्यसनात स्वदेशी व देशी असा भेद नाही, व्यसन कसलेही असले तरी त्याज्यच होय.

३३) द्यावयाचे कोणास काही एक नाही, पण शहाणपणाचा आव आणून दोन भिकाऱ्यांत कलह लावावयाचा आणि ते दोघेही मेले तर आपल्या धुर्ततेचे कौतुक करून समाधान मानून घ्यावयाचे यासच इंग्रजी कावा असं म्हणतात.

३४) आपले हजारो देशबांधव विपन्नावस्थेत असताना जे नाक धरून घरात बसतात ते ढोंगी आहेत.

३५) एकाच हातात हजारो तलवारी असण्यापेक्षा हजार माणसांच्या हातात हजार तलवारी दिल्या तरच त्या जास्त कार्यक्षम होत असतात.

३६) तुरुंगात गेलो तरी बेहत्तर, पण माझ्या सद्सद्विवेक बुद्धी विरुद्ध मी अन्याय व जुलमाला मदत करणार नाही.

३७) राष्ट्राचे अगदी अखेरचे अंतिम साध्य स्वातंत्र्य हे होय. पारमार्थिक गोष्टित काशीयात्रा हे जसे अंतिम साध्य इहलोकी आहे, तसेच राजकीय बाबतीत स्वातंत्र्यगंगा हा अंतिम हेतू आहे.

३८) आमची हल्ली अवनति झाली आहे ती हिंदुधर्मामुळे नव्हे, तर धर्म अजिबात सुटल्यामुळे झाली आहे.

३९) आमच्या विद्यार्थ्यांच्या शारीरिक शिक्षणाची आम्ही फार काळजी घेतली पाहिजे. (बलोपासना)

४०) सर्वस्वी हतभागी झालेल्या लोकांस वर येण्यास जर काही मार्ग असला तर तो

स्वावलंबन, स्वार्थत्याग, आणि धैर्य हाच होय. (बलोपासना)

४१) जोपर्यंत स्वावलंबनाची सवय लागलेली नाही तोपर्यंत आम्ही आणखी कितीही गुणसंपन्न झालो तरी व्यर्थ आहे. झाड जिवंत आहे तोपर्यंत कितीही वाकविले तरी वाढण्याची आशा आहे. पण निर्जिव झाल्यावर ते सुंदर कपाटांत जतन करून ठेवले तरी काय उपयोग? (बलोपासना)

४२) हक्क संपादन करणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेंच मिळालेले हक्क सांभाळून ठेवण्याचे व हक्काची पायमल्ली करणाऱ्यास योग्य शासन करण्याचे काम महत्त्वाचे आहे. (बलोपासना)

४३) मनुष्य व पुस्तक दोघांतही ज्ञान भरलेले असते. पण पुस्तक आपण होऊन उठून कोणाकडे जात नाही. मनुष्य जातो व सांगतो. कळते ते सांगणे हे ज्याला सुचते तोच ज्ञानी.

४४) सकाळी मी जागा झाल्यापासून रात्री झोपी जाईपर्यंत मातृभूमीच्या चिंतनावाचून माझा एक क्षणही जात नाही. हीच माझी संध्या हेच श्रीसूक्त व हाच ब्रह्मयज्ञ.

४५) स्वाभिमान, हुरुप. स्वराज्यनिष्ठा हाच राष्ट्राचा खरा जीव होय. आणि हा जिवंतपणा जेथे वसत आहे त्या ठिकाणी सुईच्या मागे जसा दोरा तद्वत् सामाजिक सुधारणाही मागोमाग येत असतातच.

४६) आपल्या देशातील लहान मोठ्या लोकांस आपले विचार कळावे अशी ज्यास उत्कट इच्छा असेल त्यांस स्वभाषेखेरीज दुसरे साधन नाही. हे इंग्रजी शिकलेल्या लोकांनी पक्के लक्षांत ठेवीले पाहिजे.

४७) मद्यप्राशन वेदाविरुद्ध आहे. मद्यपान निषेधाचे चळवळीस परमेश्वराचा पाठिंबा खास आहे.

४८) आपखुषीच्या बहिष्कारावर बलाढ्य राष्ट्राचीही मात्रा चालत नाही..

४९) जे करावयाचा तुमचा संकल्प असेल ते तुम्ही बेलाशक बोलून दाखवा आणि जे बोलून दाखववावयाची तुमची तयारी नाही ते करावयास जाऊ नका. जे करावयाचे आहे ते बोलावयास भिऊ नये व करावयाचे नाही त्या विषयी व्यर्थ बडबड करू नये.